जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५०          दिनांक -२३/१०/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन

**हायवेवरील टेंम्पो चोरी करणारा सराईत आरोपी जेरबंद**

दिनांक १४/१०/२०२४ रोजी नवले ब्रिजकडून कात्रज चौकाकडे जाणारे रोडवरील राजमाता उद्यानाचे शेजारी रोडलगत फिर्यादी यांनी त्यांचा टेम्पो लॉक व पार्क करुन ठेवला असतांना तो कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीच्या इरादयाने कोणीतरी चोरुन नेला आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ६४८/२०२४ भारतीय न्याय संहिता कायदा २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयातील टेंम्पो व अज्ञात आरोपींचा शोध घेणेबाबत मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक डी.एस.पाटील यांनी तपास पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सुचना देवुन योग्य ते मार्गदर्शन केले. मा.वरीष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे अज्ञात आरोपींचा पोलीस अंमलदार महेश बारवकर, सचिन गाडे हे शोध घेत असताना त्यांना सदरचा टेंम्पो हा रेकॉर्डवरील आरोपी **प्रशांत दिगंबर पाटील, वय ४० वर्षे, रा.कृष्ण वॉटर पार्क, सिंहगड रोड, सुभेदार हॉटेलजवळ, मुळ रा.जि.छत्रपती संभाजीनगर** याने केला असुन तो टेंम्पो घेवुन नाशिक येथे जात आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली. त्याप्रमाणे पोलीस अंमलदार महेश बारवकर, सचिन गाडे यांनी नाशिक येथे जावुन नमुद बातमीच्या आधारावरुन चोरीस गेला टेंम्पो नाशिक येथुन ताब्यात घेवुन नमुद आरोपी यास दाखल गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग, श्री.प्रविणकुमार पाटील , मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्रीमती स्मार्तना पाटील , मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री. राहुल आवारे, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार महेश बारवकर, सचिन गाडे, धनाजी धोत्रे, सचिन सरपाले, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, महेश बारवकर, मंगेश पवार, सतिश मोरे, नवनाथ भोसले, निलेश खैरमोडे, मितेश चोरमाले, सागर बोरगे, अभिनय चौधरी, यांच्या पथकाने केली आहे.